# गजानन कीर्तिकर

खासदार (लोकसभा)
नेते–शिवसेना
27, मुंबई उत्तर–पश्चिम लोकसभा
सदस्य
लोकलेखा समिती
रेल्वे स्थायी समिती

सत्यमेव जयते

102, स्नेहदीप, पहिला मजला, आरे मार्ग,
गोरेगांव (पूर्व), मुंबई–400063
दूरध्वनी : 022-29270262, 29270362
ई-मेल : gajanan.kirtikar@yahoo.com
वेबसाईट : www.gajanankirtikar.com
दिल्ली :
बी–702, एम.एस. फ्लॅटस्, बी.के.एस्. मार्ग
नवी दिल्ली–110 001
दूरध्वनी : 011-23326556


**दिनांक : 24/06/2019**

**प्रति,**

**मा. वृत्त संपादक,**

**यांसी,**

**खालील वृत्तनिवेदन आपल्या लोकप्रिय दैनिकात कृपया अवश्य प्रसिध्द करावे, ही विनंती.**

**आपला नम्र,**

**( प्रसाद जोशी )**
**स्विय सहाय्यक**
**मो–9594977982**

---

## खासदार गजानन कीर्तिकर यांनी उपस्थित केला ई – सिगारेट विषयी प्रश्न !

**नवी दिल्ली : लोकसभेचे पावसाळी अधिवेशन सध्या सुरु आहे. विविध विषयांवर मागील पाच वर्षात १ हजारहून अधिक प्रश्न विचारणाऱ्या खासदार गजानन कीर्तिकर यांनी यावेळीही महत्वाचे आणि तितकेच संवेदनशील प्रश्न उपस्थित केलें आहेत. तरुणांना मगरमिठीत घेणाऱ्या ई– सिगारेट विषयी खा. कीर्तिकर यांनी तरुणांमधील आकर्षण आणि त्याचे दुष्परिणाम, ऑल इंडिया मेडिकल सायन्सेस कडून त्यावर केली जाणारी कारवाई आणि शासनाकडून घेतली जाणारी खबरदारी, तरुणांमधील ई – सिगारेट विषयी कमी पडणारी जनजागृकता आणि त्यावर शासनाकडून राबविले जाणारे जागरूकतेचे धोरण याविषयी प्रश्न उपस्थित केला.**

**आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने याबाबत दिलेल्या माहितीनुसार ग्लोबल अडल्ट टोबॅको सर्व्हेक्षणानुसार देशातील सुमारे ३ टक्के प्रौढांना ई – सिगारेट विषयी माहिती असून अंदाजे ०.०२ टक्के तरुणांना त्याचे व्यसन आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन च्या अन्वये ई – सिगारेट मुळे गर्भधारणा, प्रजनन क्षमता यावर विपरीत परिणाम व श्वसनाचे विकार त्याचप्रमाणे मुलांच्या मेंदू विकसन आणि आकलन क्षमतेवर देखील याचा परीणाम होत असल्याचे तज्ञांचे मत आहे. दरम्यान याविषयी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून जास्तीत जास्त जनजागृती केली जावी यासाठी संबंधित मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे खा. कीर्तिकर यांनी सांगितले.**

---